# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २४/३/२००८ रोजी संपन्न झालेल्या अर्थसंकल्पीय स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१९) इतिवृत्त

मंगळवार दिनांक **२४ मार्च २००८** रोजी मा.सभापती **श्री. त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा, महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी १२.५० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. संजय शिरसाट
2. श्री. सावंत मधुकर दामोधर
3. श्री. पुरूषोत्तम ठाकुर
4. श्रीमती जयश्री किवळेकर
5. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
6. श्री. अ. रशीद खान (मामु)
7. श्री. संजय जोशी
8. श्री. वसंत नरवडे पाटील
9. श्री. मोहन मेघावाले
10. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
11. श्री. मो. जावेद मो. इसाक
12. श्री. अ.साजेद अ.सत्तार
13. श्री.हाजी शेरखान अ. रहेमान

**विषय क्र. 463 :**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये सादर केलेल्या, सन 2007-2008 चे सुधारीत व सन 2008-2009 चे मुळ अर्थसंकल्पावर विचार विनिमय करणे.**

**संवाद :**

मा.सभापती : मा.आयुक्त अर्थसंकल्पात नमुद असलेल्या वेगवेगळया नवीन योजना राबविण्याच्या तसेच विकास कामाच्या संदर्भात व्हीडीओ प्रेजेन्टेशन नुसार माहिती देतील.

मा.आयुक्त : प्रशासनाने समितीसमोर रिवाईज व पुढील वर्षाचे प्रपोज बजेट सादर केले या महापालिकेत उप आयुक्त दर्जाचे करमुल्य निर्धारक व संकलक म्हणून श्री.खालेद बी. अरब हे रूजू झालेले आहे. परवानगी असेल तर ते सभागृहाला ओळख करून देतील.

मा.सभापती : नव्याने रूजु झालेले उपआयुक्त श्री.अरब साहेब यांनी ओळख करून द्यावी.

कर निर्धारक व संकलक : माझे नाव खालेद बी. अरब असून मी मंत्रालयीन कॅडरचा सेक्शन ऑफिसर आहे. सन १९९९ मध्ये सेवेत रूजू झालो. मंत्रालयात विविध तीन विभागात काम केले. आता हज कमेटीमधून सेक्शन ऑफिसर या पदावरून महानगरपालिकेत कर निर्धारक व संकलक म्हणून रूजू झालेलो आहे.

मा.सभापती : स्थायी समितीच्या वतीने आपले स्वागत करतो. आता मा.आयुक्त यांनी प्रेझेन्टेशन सुरू करावे.

मा.आयुक्त : (सन २००७-०८ चे सुधारीत तसेच सन २००८-०९ चे मुळ अंदाजपत्रकावर पावर पॉईंट प्रेझेन्टेशनद्वारे माहिती देतात.)

चालू वर्षात जे काही बदल होतात त्या ठळक वैशिष्टे बाबत खुलासा असा की, या वर्षी इ.आर.पी. प्रकल्प अंतर्गत काम सुरू केले आहे. सन २००८-०९ च्या बजेटमध्ये दोन मुलभुत बदत होणार आहे. एक तर १०० टक्के डबल अकाऊटींग करीत आहे. आतापर्यत टेस्टींग म्हणून करीत होतो. आता १०० टक्के १ एप्रिल पासून सुरू करीत आहोत. इआरपी सॉप्टवेअर मध्ये मार्चला टेस्टींगचे काम सुरू होणार होते. आता तेच काम पाच-सहा दिवसानंतर सुरू होईल. १ मे पासून लॅन करू. १५ दिवस टेस्टींग व डाटा फिडींगसाठी लागतील. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर बजेट इआरपीमध्ये फिड होणार आहे.

श्री.संजय जोशी : उदा. ३३७ कोटीचे बजेट आहे.यात आणखी वाढ होवून तेवढे उत्पन्न झाले नाही तर इ.आर.पी. काय काम करणार आहे.

मा.आयुक्त : इ.आर.पी. मध्ये फायनल बजेट मंजूर होईल. ते चुकीचे झाले असे संगणक डिसाईड करू शकत नाही. आहे त्या बजेटप्रमाणे होईल. उत्पन्न केंव्हा किती झाले कॉम्प्युटरमध्ये फिड करावे लागेल. जर एखाद्या महिण्यात कमी वसूली झाली तर संगणकात ते कुठेतरी फिवचर मध्ये टाकेल. वर्क ऑर्डर देतांना उत्पन्न आहे की नाही याचा विचार केला जाईल.

श्री.संजय जोशी :वर्षाच्या सुरूवातीला मालमत्ता कर कमी स्पीडने जमा होतो. त्यावेळी कामाची प्रगती कशी असणार आहे. इआरपी म्हणजे उत्पन्नानुसार कामे मंजूर होतील.

मा.आयुक्त : सुरूवातीला २१ कोटी शिल्लक आहे त्यानूसार जेंव्हा वर्क ऑर्डर दिली जाते केव्हा काम पूर्ण होणार बील कधी येणार याची पण अपेक्षा असते. कोणतेही कमेटमेंन्ट दिले तरी त्यास किती कालावधी लागेल हे इन्टरली दिलेले आहे. त्याप्रमाणे फ्युचरमध्ये प्रोजेक्ट करेल कधीही रक्कम निगेटीव्ह होवून जाणार नाही. त्यास प्रत्येक वेळी ओव्हरराईट करावे लागेल.

श्री.संजय जोशी : एप्रिल, मे, जून महिण्यात नगण्य स्वरूपात मालमत्ता कर वसूल होतो. त्यानंतर डिसेंबर, जानेवारी मध्ये पुन्हा जास्ती प्रमाणात वसुली होते. त्याप्रमाणे विकास कामे होणार काय?

मा.आयुक्त : मागच्या वर्षी ज्याप्रमाणे होते त्या पध्दतीनेच होत राहणार. फक्त रिमाईण्ड करण्याची गरज पडणार नाही. यात आपोआप होत राहील. उदा. १ एप्रिलला एक्स रक्कम स्पील ओव्हरमध्ये जात आहे आजची सुरूवातीची शिल्लक जितकी असेल तेवढ्या रकमेची काम देण्यात कॉम्प्युटरला अडचण नाही.

श्री.संजय जोशी : हेडवाईज, वार्डवाईज बजेट ठेवलेले आहे. मागिल वेळेस शिक्के तयार करून आणले. ५० लक्षच्या वर काम करणार नाही. हाताने लिहिण्याची गरज नाही. हा खर्च करण्याची गरज आहे का?

मा.आयुक्त : ईआरपी हे येणे व जाणे बाबतचा ते प्रोजेक्ट करत राहील. आज वर्कऑर्डर दिले तर चार महिण्याने पेमेंन्ट करायचे ते केले नाही तर रक्कम निगेटिव्ह होवू शकते म्हणून वर्क ऑर्डर देवू नये. ओव्हरराईट करावे लागेल.

श्री.अ.रशिद खान : निविदा कॉम्प्युटरद्वारा दिले, चुक झाली आताही बंद आहे. आणखी उशीरा काम होत आहे. बोलायला, ऐकायला चांगले वाटते.

मा.आयुक्त : यात एकदा निर्णय झाल्यानंतर काम लवकर होते.

श्री.संजय जोशी : ३ कोटी खर्च करून आधीच्या पध्दतीत काय सुधारणा होईल.

मा.आयुक्त : एखादा विभागाने काम केले संगणक ॲटोमेटीकली बाकी विभागास इन्फॉर्म करेल. नगररचना विभागाने परवानगी दिली तर मालमत्ता विभागास लगेच कळेल की जागा महापालिकेच्या ताब्यात यायला पाहिजे.

श्री.संजय जोशी : आर्थीक फायदा काय होईल?

मा.आयुक्त : उत्पन्न कसे येईल हे अपेक्षीत आहे. कोणत्या महिण्यात किती उत्पन्न मिळेल हे संगणक प्रोजेक्ट करणार आहे. नवीन काम मंजूर केले, भविष्यात त्यांचे

बिल केंव्हा येणार व कोणत्या महिण्यात निगेटीव्हे मध्ये येणार आहे. जर तसे दाखवेल त्याची अमलबजावणी करायची की नाही हे वेगळे आहे. एखादया कामाच्या सर्वसाधारण सभा, स्थायी समिती किंवा आयुक्त म्हणून मी निर्णय दिला त्याची टाईम लिमीटमध्ये कार्यवाही व्हायला पाहिजे जर झाली नाही तर संगणक प्रत्येक वेळी अलर्ट करेल. किती कामे करतात व ओव्हरराईट करता हे आपल्यावर अवलंबून असणार आहे. एखाद्या कामाचे बील दाखल झाले, तीन दिवसाची मुदत दिली, तीन दिवसात कार्यवाही झाली नाही तर अलार्म करत राहणार तीन दिवस आणखी गेल्यास नंतरचे बील घेण्याचे बंद करणार. इआरपी मध्ये काय करून घ्यायचे हे महापालिकेवर अवलंबून आहे. इआरपी मध्ये पहीली स्टेप आज काय प्रोसेस चालू आहे त्यास असीस म्हणतात. दुसरी स्टेप अशी की, काय असायला पाहिजे. कोणत्याही संचिकेची डेडलाईन तीन दिवसाची असेल. तीन दिवसानंतर ज्यांचेकडे द्यायची त्यांना अलार्म करायचे. तीन दिवसाच्या आत केले नाही आणखी तीन दिवस गेल तर त्यांनी त्यांचे विभागप्रमुखांना इन्फॉर्म करायचे की सहा दिवसापासून संचिका पेंडीग आहे. त्या सहा दिवसात नंतरची येणारी संचिका थांबवायची. जे विभाग प्रमुख असतील ते ओव्हरराईट करून कार्यवाही करू शकतात. प्रत्येकांना दायित्व फिक्स होते. जेणे करून कोणते पेंडीग होते. अंदाजपत्रक तयार केल्यानंतर जे आहे त्यांची संचिका तयार होणार.

श्री.संजय जोशी : इआरपी झाल्यानंतर अंदाजपत्रक ॲटोमॅटीक तयार होणर आहे काय?

मा.आयुक्त :अंदाजपत्रक होईल, वर्कऑर्डर पण निघतील. आयुक्तांची सही झाल्यानंतर ऑर्डरवर जेथे इन्प्लीमेंटेशन व्हायचे तेथे ॲटोमॅटीकली होईल.

श्री.संजय सिरसाट : मागिल कामाची जोपर्यंत एनओसी येत नाही तोपर्यत नवीन कामाचे वर्कऑर्डर देता येत नाही असे त्यात दिसेल का?

मा.आयुक्त : कॉम्प्युटर दाखवेल की निगेटीव होणार आहे. ओव्हरराईट करण्याचे अधिकार फक्त आयुक्तांना असतील.

श्री.संजय सिरसाट : सीस्टीम चांगली आहे स्पील ओव्हर जो प्रकार आहे तो बंद होईल. पुर्वीची संचिका गेल्याशिवाय दुसरी वर्क ऑर्डर निघणार नाही.

मा. आयुक्त : संगणकाचे काम प्रत्येक वेळी अलार्म करणे राहील, थांबविणे नाही. बजेटमध्ये जर काम असेल तर जे.ई. यांना तीन महिण्याची कालमर्यादा देवून सर्व अंदाजपत्क तयार करून घेणार कॉम्प्युटर अलॉन करेल की अमुक अंदाजपत्क राहिलेले आहे. डिसीजन मेकींग ॲथॉरिटी चार आहे.

श्री.संजय जोशी : स्थायी समिती समोर यायचे अगोदर जेंव्हा टेंडरच्या फायनल सही साठी जाईल दुस-यांदा जेंव्हा एजन्सी फिक्सींगसाठी येते तेच येणार नाही.

मा.आयुक्त : चार लेव्हलवर आहे जे.ई. यांना तीन महिण्याच्या आत सर्व अंदाजपत्रक तयार करावे लागेल. १० लक्ष पेक्षा जास्त असेल तर ओव्हरराईट करण्याचे अधिकार आयुक्तांना असतील. त्यानंतर स्थायी समितीच्या ठरावानंतर पुढील कार्यवाही होईल ओव्हरराईट करण्याचे फायनान्सीयल अधिकार फक्त आयुक्तांना असेल.

श्री.संजय जोशी : यापेक्षा जास्त रक्कमेचे नको म्हणून संचिका पाठविणारच नाही जेई अंदाजपत्क तयार करेल.

मा.आयुक्त : अंदाजपत्क तयार केले तर जेईचे काम संपले वाट बघणार एरीस्टो अप्रोलची

श्री.संजय जोशी : जेई, उपअभियंता, त्यानंतर कार्यकारी अभियंता यांचेकडून लेखा विभागाकडे जाईल त्यावेळी जर वार्डवाईज खर्चाचे उद्दीष्ट दिलेले आहे त्यापेक्षा जास्त होत असेल तर ॲटोमॅटीकली ते होईल काय?

मा.आयुक्त : ५० हजार रक्कमेच्या वरती काम होत आहे अवलोकनार्थ सादर असे लिहिले जात होते तसेच संगणकावर येईल. ओव्हरराईट करते वेळी स्पेशल पासवर्ड मागेल त्यानंतर ओव्हरराईट होईल. आताच जे काही होते तेच होईल

फक्त अकाऊन्टलीबीटी वाढेल. यात चार विभाग त्यात लेखा, इंजिनियरींग विभाग, मालमत्ता विभाग तसेच अस्थापना विभाग घेतलेले आहेत. काही कर्मचाऱ्यांची वेतनवाढ होत नाही. आयुक्तांचे पासवर्ड झाले की ॲटोमॅटीकली त्या कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये वाढ होईल. दुसरी ऑर्डर काढण्याची गरज नाही. जे विना डिसीजनची बाब राहील ती ॲटोमॅटीकली होईल. अकाऊटींग हे सर्वात मोठे काम करीत आहे. डबल अकाऊटीगंचे काम सर्वात मोठे १ एप्रिल पासून करीत आहे. सर्व ॲसेसचे व्हॅल्यूएशनचे काम चालू आहे. पुर्ण होत आलेले आहे. जितके मालमत्ता कर येणे आहे ते ॲसेट दाखवतील. जितके आले तितके कमी करून कॅश मध्ये येईल एकूण उत्पन्न तेवढेच राहते.पूर्वी ॲसीट मध्ये दिसत होती येणारी रक्कम आणि आलेली रक्कम डबल अकाऊटींग त्यासह इआरपी हे अकाऊन्ट सिस्टीमला स्मूथ करेल.

श्री.संजय सिरसाट : लेखाशिर्षक बदलले तर त्याप्रमाणे संगणकात नोंद होईल काय?

मा.आयुक्त : लेखाशिर्षक बदलले तर संगणकात ही बदल करावा लागेल. एखादया संचिका कुठे व कीती दिवसापासून आहे. प्रोजेक्टचा नंबर टाकलाकी लगेच मिळून येईल. दुसरे असे की संगणक स्वत:हून काही करीत नाही आपल्याला करावे लागते. टुबी मध्ये जितके टाकता येईल तेवढे टाकू.एक दोन महिणे काम करण्यास अडचण येईल. एकदा सीस्टम स्मूथ झाले की फास्ट काम होईल. अकांउटीबीलीटी १०० टक्के राहील.

श्री.संजय जोशी : महापालिकेचा आर्थिक फायदा यात काय आहे.

मा.आयुक्त : एकदा संचिका तयार झाली की ती १० ठिकाणी जावून १० कर्मचा-योच्या हातून जाते. शिपायाची मेहनत कमी होईल. जे मॅनेजमेन्ट चालते ते काम कमी होईल. ईआरपी केल्यानंतर फारसे पैसे मिळायला पाहिजे. कारण संगणक ॲक्शन करीत राहील की अमुक अमुक न केल्यामुळे नुकसान होत आहे. यात अभियांत्रिकी विभाग तसेच अस्थापना विभाग पुर्ण केलेला आहे. मुंबईच्या नंतर औरंगाबादचा नंबर असणार मागिल वर्षी आयआरडीपी अंतर्गत रस्त्याचे काम सुरू केले. एक रस्ता वगळता बाकी ५५ कोटीचे रुस्ते सुरू केले.

श्री.संजय जोशी : पीएमसीला जे १ ते दीड टक्का अंदाजपत्रक करण्याचे देतो ते देण्याची गरज पडणार का.

मा.आयुक्त : पीएमसीला सुरूवातीपासून सर्वे , अंदाजपत्रक तसेच जेंव्हा काम चालू असते त्यावर सुपरव्हिजन पासून तसेच बील चेकींगपासून कॉलीटी चेकींगपासून शेवटपर्यतचे देतो.

श्री.संजय जोशी : सर्वे, अंदाजपत्रक तसेच टेंडर काढेपर्यंत एक टक्का मंजूर केलेले आहे. हे बंद होणार आहे का?

मा.आयुक्त : सर्वेचे काम त्याच बरोबर कॉन्टीटी काढण्याचे काम द्यावेच लागणार आहे.

श्री.संजय जोशी : ३ कोटी खर्च केल्यानंतर ॲटोमॅटीक सर्वेचे काम होणार अशी आमची अपेक्षा आहे. तरी पण पीएमसी नेमण्याची गरज पडत असेल तर योग्य नाही.

मा.आयुक्त : ज्या ज्या ठिकाणी महापालिकेचे कर्मचारी अंदाजपत्रक करणार तेथे पीएमसी ची आवश्यकता नाही.

श्री.संजय जोशी : असा कोणता प्रोजेक्ट आहे की ते महापालिकेचे अधिकारी सर्वे वगैरे करणार नाही.तीन कोटी खर्च करून आताच म्हटले की अंदाजपत्रक तयार होणार.

मा.आयुक्त : कमांड द्यावी लागेल. उदा. ५० फुट लांबीचे डांबरीकरण ५० कोठून आले सर्वे कुणाकडून करायचा हे डिसाईड करावे लागेल.

श्री.संजय जोशी : महापालिकेची जेई सर्वे करू शकतील. ईआरपी मंजूर झाल्यानंतरही पीएमसीचे १ टक्का चालू राहणार.

मो.आयुक्त : ईआरपी व पीएमसीचा काहीही संबध नाही- ईआरपीच्या संबधीत आहे कमान्ड दिल्यानंतर उदा. रस्त्याचे काम आहे. किती फुट लांबीचे आहे हे द्यावे लागेल. फिजीकली जागेवर जावून सर्वे करून कॉन्टेटी काढावी लागते. ती फिड करून अंदाजपत्रक डीएसआर इन्टरनली आत आहे. जे पात्र असतील त्यांना चेक करण्याची गरज भासेल. वर्क ऑर्डरपर्यत आले जेंव्हा काम सुरू आहे साईज कॉन्टीटी कोण तपासणी करणार. एम.बी. रेकॉर्डीग कोण करणार आहे. हे सर्व ईआरपीच्या बाहेरची बाब आहे. एम.बी. रेकॉडींग करून इनपुट करावे लागेल.

श्री.संजय जोशी : अंदाजपत्रक केल्यानंतर त्याप्रमाणे पूढील रेकॉर्ड तयार होत असतील.

मा.आयुक्त : इजिनिअरचे थोडेसे काम कमी झालेले आहे. सर्वेचे कॉन्टेटी काढण्याचे काम कमी झाले नाही.परंतु कॉन्टेटीवर रेट मटेरियल काढण्याचे काम कमी झाले. एमबी रेकॉर्डीग वर बील तयार करण्याचे काम कमी झाले नाही.

श्री.संजय जोशी :अनेक कामे कमी होणार नाही तर दोन कोटी खर्च करणे संयुक्तीक वाटते का?

मा.आयुक्त :कार्यालयाचे काम सुरळीत करण्यासाठी हे करीत आहोत कार्यालयाच्या बाहेर काय होत आहे त्यांचे मेजरमेन्ट कुणालातरी करावे लागेल. संगणकावर आपोआप होणार नाही.

श्री.संजय जोशी : नेहमीप्रमाणे प्रस्ताव दाखल करून मंजूरी घेत आहे ईआरपी तसेच आता पीएमसी ही मंजूर करून घेत आहे हे योग्य वाटत नाही.

मा.आयुक्त : एखाद्या रस्त्याचा विकास करायचा त्या ठिकाणी सर्वे करण्याची गरज भासणार आहे. तेथील परीस्थिती व त्याची डिझाईन तसेच ज्या लाईन केंबल असेल त्यास शिफ्ट करणार की नाही ते डिसाईड करावे लागेल.

श्री.संजय सिरसाट : २५ वर्षापासून सर्वेचे काम महापालिकेचे अधिकारी करीत आलेले आहे पीएमसीला सर्वेचे काम दिल्यास अधिका-याचे काम काय असणार आहे. महापालिकेच्या अधिका-याकडून सर्वेचे काम करून घ्यावे.

मा.आयुक्त : ईआरपी मूळे अधिकारी कर्मचारी यांना होणारा कामाचा त्रास कमी होईल.

श्री.संजय सिरसाट : सर्वे पीएमसी करेल कमान्ड जे.ई. देईल. बरीच कामे ही जे.ई.ला करावी लागणार आहेत. पीएमसीला ईआरपीसी जास्त संबध येत नाही. असे असतांना पीएमसी गरज नाही. २ कोटी खर्च करीत आहे अभियंता यांना कामाची सवलत ही देत आहेत.

मा.आयुक्त :पुर्वी अभियंता हे १० ॲक्टीव्हिटीज करीत होते. त्यातील चार-पाच ॲक्टीव्हीटीज कमी होतील. तर एक जे.ई. पुर्वी जे अंदाजपत्रक तयार करीत होते त्यापेक्षा जास्त तयार करतील. जेवढा सर्वे करीत होते त्यापेक्षा जास्त सर्वे करतील. जे अभियंता आहे ते कामाचा व्याप लक्षात घेता आजही कमी संख्या आहे.

श्री.संजय सिरसाट :दुय्यम आवेक्षकांसह ९० अभियंता आहेत. एक अभियंता यांनी १० अंदाजपत्रक तयार केले तर महिण्यात किती तरी अंदाजपत्रक तयार होतात. पीएमसीची गरज नाही.

मा.आयुक्त : क.अभियंत्यांना यांना फक्त अंदाजपत्रकच तयार करण्याचे काम नसते. इतरही कामे करावी लागतात.

श्री.संजय जोशी : एक हजारपेक्षा जास्त अंदाजपत्रक तयार होत नाही. २५ हजार रक्कमेचीच १० हजार पर्यत अंदाजपत्रक असतात. ते ऑलरेडी डाटा असतो तो लगेच तयार करता येतो.

मा.आयुक्त :वाजवीपेक्षा जास्त जेई आहे असे सभागृहाला वाटत असेल व असेल तर ठिक आहे पीएमसीला काम दयायचे की नाही विचार करून परंतू सर्व विभागात जेवढे जेई पाहिजे तेवढी संख्या नाही असे प्रशासनाचे मत आहे.

श्री.संजय सिरसाट :कनिष्ठ अभियंता यांना जास्तीचे काम द्यावे. सर्वेचे काम महापालिकेनेच करावे.

श्री.संजय जोशी :पाणीपुरवठा विभागात जेई वसुली साठी आले तरी संबधीत नागरीक १८००रू. बील देणार आहे.त्यापेक्षा जास्त देणार नाही. जकातीचे खाजगीकरण झाले १५० कर्मचारी वसुली साठी देणार होते. जो कर्मचारी जेथे काम करू शकतो तेथे त्यास प्रॉपर कामाला लावावे. कुणाला कुठे काम दयायचे या बाबतीत प्रशासन तज्ञ आहे  कार्यवाही का होत नाही.ईआरपी झाल्यानंतरच बोलतो आहे. पीएमसीची गरज नाही. आपल्या अधिकाऱ्याकडून काम करून घ्यावे.

मा.आयुक्त :आहे ते काम पुर्ण करण्यासाठी पुरेसे जे.ई. आहे अशी सभागृहाची भावना झालेली आहे. तसे असेल तर  पीएमसी लावणार नाही. कर्मचारी कमी असेल तर पीएमसी लावू शकतो.

श्री.संजय जोशी :शहरात चार पाच रस्त्याचे काम पीएमसीच्या मार्फत होत आहे.महापालिकेचे जेई दिले तर चांगले काम करतील  जेथे काम चालू आहे तेथे सध्या पीएमसीचा कर्मचारी नाही श्री. सोनवणे साहेब यांना चार वेळेस कळविले.त्यासाठी महापालिकेचे जेई त्या रस्त्यावर दयावे. चांगले काम केले किंवा झाले नाही तर अधिकारी यांना जबाबदार धरू शकतो.

मा.आयुक्त : एक एक कामासाठी २४ तास जे.ई. ठेवण्यास तेवढा स्टॉफ नाही. तो भरती करून त्यांचे खर्चाचा विचार केल्यास परवडणारे नाही. म्हणून पीएमसी नेमावी लागते. एमजीपी मार्फत काम केले तर काही टक्केवारी प्रमाणे फिस देतो. एमएसआरडीसी २.५ टक्के प्रमाणे करते. एकतर कर्मचारी वर्ग भरती करून त्यांचेकडून काम करून घ्यावे नसता हे करणार नसेल तर पीएमसी नियुक्त करून कार्यवाही करणे. उदा. एखादी इमारत करणार आर्कीटेक्ट आपल्याकडे नसतात १.५ टक्के देवून आर्कीटेक्टला काम दिले जाते. जे आर्कीटेक्टचे काम आहे ते बेसीकली पीएमसीचे काम आहे. आर्कीटेक्टला कायमची नोकरी देवून खर्च करू शकत नाही त्यापेक्ष दोन कारणामूळे पीएमसी नेमावी लागते. कर्मचारी वर्ग कमी असेल किंवा ज्या पध्दतीने कॅपॅसिटी पाहिजे त्या प्रमाणे नसते म्हणून पीएमसी नेमावी लागते. आर्कीटेक्ट डिझाईन वगैरे करून देतात, ते पीएमसी म्हणूनच असते. हॉस्टेल करीत आहोत. महापालिकेची कॅपीसीटी नाही म्हणून पीएमसी नियुक्त केली रस्ते जे करीत आहोत त्याची १०० टक्के कॉलीटी टेस्टींग करणे आहे. १०० रू. खर्चाचे कामासाठी २.५० पीएमसीला खर्च होत असेल व काम चांगले होत असेल तर करण्यास हरकत नसावी.सरसकट सर्वच कामासाठी पीएमसी लावणार नाही.

श्री.संजय सिरसाट : साईटवर दुय्यम आवेक्षक हे नियमीत, १०-१५ दिवसातून एक वेळेस कार्यकारी अभियंता, चार दिवसातून एक वेळेस उपअभियंता हे पाहणी करीत असेल ही पध्दती होती. अधिकारयाच्या नियंत्रणाखाली काम झाल्यास व ते चांगल्या प्रतिचे न झाल्यास जबाबदार धरता येईल  पीएमसीला काय करू शकतो.

मा.आयुक्त : असे जेंव्हा होत तेंव्हा ५० कोटीचे बजेट असेल आता ३०० कोटीचे असून तितकेच कर्मचारी वर्ग काम करीत आहे.

श्री.संजय जोशी : ३०० कोटीत किती कामे झालेली आहे.

मा. आयुक्त :१० कोटीचे ए-१ चीच कामे झालेली आहे. जेई संख्या केंव्हा वाढ झाली खुलासा घेतल्यास समजून येईल.९० इजिनिअरची संख्या हि किती दिवसापासून आहे. किती कामे होत होती आता किती होते.

श्री.संजय जोशी : पूर्वी जे.ई.ला सर्व बघून अंदाजपत्रक तयार करावे लागत असे. आता लगेच कमान्ड देवू शकतो. जे कर्मचारी ते कमी करून आहे त्यांचेकडून जास्तीचे काम करून घेण्यासाठी हे करीत आहोत. असे असतांना पीएमसी नेमण्याची

गरज काय? यांचे काळात त्या टाईपचे डिझाईनही नसतीलही. सॉप्टवेअर घेतले तर आर्कीटेकटची गरज नाही. ५० इमारतीचे डिझाईन येते.

मा.आयुक्त : १० वर्षापासून स्टाफ वाढलेला नाही. ते वाढविणे शक्यही नाही. परंतू काम वाढत जात आहे. जो गॅप पडलेला आहे तो पूर्ण करण्यासाठी पीएमसी नेमावी लागते.

श्री.संजय जोशी : दोन कोटी सॉप्टवेअरसाठी एक कोटी हार्डवेअरसाठी असे तीन कोटी खर्च करीत आहोत. तरीही कर्मचारी कमीच पडतात असे प्रशासन म्हणत असेल तर योग्य नाही. तसेच असेल तर हे करू नये. ईआरपी केल्यानंतर लेखा विभागाचे ५० टक्के कर्मचारी वसुलीसाठी पाठवावे असे माझे मत आहे.

मा.आयुक्त : कामाचा व्याप कर्मचारी वर्ग कमी, यात जो गॅप पडलेला आहे तो संगणकाद्वारे तसेच पीएमसी नेमून कमी करावा लागेल.

श्री.संजय जोशी : लेखाधिकारी वगळता इतरांना प्रत्येक संचिका खतवून आणण्याची गरज पडणार नाही.रिजर्व बँकेत एक मॅनेजर दोन क्लार्क असतात. करोडोची उलाढाल होते.ईआरपी केल्यानंतर या महापालिकेतही कमी कर्मचारी लागतील. कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे असे वारंवार बोलणे प्रशासनाचे योग्य वाटत नाही.

मा.आयुक्त : महापालिकेकडील कर्मचारी यांना आराम देवून त्यांचेकडून कमी काम करून घेवून पीएमसी नेमण्याचा प्रशासनाचा हेतू नाही. ईआरपी मूळे कर्मचाऱ्यांना काम करणे सोपे जाईल व आणखी जास्तीचे काम होईल. काम आणि कर्मचारी वर्ग लागतो त्याचा गॅप कमी होणार आहे म्हणून पीएमसीची गरज कमी भासणार आहे. ती गरज शुन्य होईल याची शाश्वती नाही.

श्री.संजय जोशी : एक जे.ई. दिवसातून १०० अंदाजपत्रक तयार करू शकेल. फिजीकली सर्वेला वेळ लागणार नाही.

मा.आयुक्त : सर्वेसाठी वेळ लागतो साईड इन्स्पेक्शन न करता कोणत्याही कामाचे अंदाजपत्रक तयार करायला नको असे असे प्रशासनाचे मत आहे.

श्री.संजय जोशी : जेंव्हा आपण आयुक्त म्हणून आलात तेंव्हा पासून वर्कवाईज बजेट सुरू झाले.

मा.आयुक्त : वर्कवाईज बजेट मा.श्री.भोगे साहेब होते तेंव्हापासून सुरू आहे असे वाटते. मी रूजू झाल्यापासून सुरू झाले असेल तर आनंद आहे. आणखी कामाचा समावेश करावा. वर्कवाईज बजेटच असायला पाहिजे. जोपर्यंत टेक्नीकली अप्रुव्हल होत नाही तोपर्यत बजेटमध्ये येत नाही. जी कामे बजेट मध्ये येतात त्यासाठी १.५ टक्के देवून पीएमसीकडून करण्याचे सजेस्ट केले होते. त्यात इकडील रक्कम इतर टिकाणी ट्रान्सफर करण्याची गरज पडणार नाही. किंवा तेवढे इजिनिअरर्स नियुक्त करावे.

श्री.संजय सिरसाट :वसुलीच्या कामासाठी जेई दिले असतील तर ते घेवून त्यांना अंदाजपत्रक करण्याचे काम द्यावे.

मा.आयुक्त :वसुलीच्या कामावरील कर्मचारी घेतले ईआरपी चे काम सुरू केले तरी पुर्ण गॅप भरणार नाही. जे.ई. पदे अनेक दिवसापासून भरलेली नाही.

श्री.संजय जोशी :लोकसंख्या तसेच वसुलीचा विचार करता महापालिका ड वर्गात जायला नको होती. मुळ विषयाकडे येतो जर एवढे अद्यावत सॉप्टवेअर आहे कमान्ड दिल्यानंतर चार मिनिटात अंदाजपत्रक तयार होवून येते थोडया वेळासाठी सर्वेकरण्यास व जेई कमी आहे असे कारण सांगणे योग्य वाटत नाही.

मा.आयुक्त :ईआरपीमूळे अभियंताचे काम कमी होईल सध्याचे अभियंता आहे त्यांचे काम वाढविता येईल आउटपुट जे वाढविणार आहे जो डिपार्टमेन्टचा स्टॉफचा आणि कामाचा जो गॅप आहे तो १०० टक्के कमी होईल असे नाही. जर काही गॅप राहिला तर पीएमसी लावणार नसता लावणार नाही.जर सभागृहाला वाटले सर्व कामे स्पीडने चालू आहे तर पीएमसी लावू नये.

श्री.संजय जोशी : १०५ वार्ड साठी ३० लक्ष प्रमाणे २० कोटी होतात ईआरपी झाल्यानंतर या २० कोटीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यास किती वेळ लागेल.

मा.आयुक्त : जे.ई. नुसते अंदाजपत्रकच करतात असे नाही इतरही कामे करावी लागतात.

श्री.संजय जोशी : जे.ई. चे प्राथमिक कर्तव्य अंदाजपत्रक तयार करणे असते.ड्रेनेज लाईन चोकअप साठी पीएमसी नेमली जाते तरी सुध्दा तेथे जेई पाठविले जाते.

मा.आयुक्त : देखभाल दुरूस्तीचे काम हे सुध्दा प्राथमिक कर्तव्य आहे.

श्री.संजय जोशी : दुय्यम आवेक्षक यांचेकडून काम करून घ्यावे. जे.ई.ला दुसरे काम द्यावे.

मा.आयुक्त : जे.ई. कडून पुरेपूर काम करून घेतले जाईल यात शंका नाही. प्रशासन सहमत आहे. पुर्ण वापर करून जो काही गॅप निघतो तो भरून घेता येईल. १०० टक्के पीएमसीकडे कामे देणार नाही.

श्री.मधुकर सावंत : जे.ई.ला काम नाही. श्री. सोनी साहेब सेवानिवृत्त झाले चार पाच अभियंता बसून आहे.

मा.आयुक्त : जे.ई.चा वापर पुरेपर करावयास पाहिजे. जेई कमी पडत असेल तर दोनतीन पर्याय आहे. एकतर पीएमसी नेमावी किंवा कॉम्प्युटराजेशन करावे काम कमी होते. किंवा काही कामासाठी खाजगीकरण केल्यास गॅप भरेल परंतू नवीन जेई भरणे शक्य नाही घेता पण येणार नाही.

श्री.संजय जोशी :आहे त्याच जेई कडून काम करून घ्यावे.पीएमसी बंद करावी आठ रस्त्याचे प्रोजेक्ट चालू आहे त्या ठिकाणी जेईला नियुक्त करावे.महापालिकेच्या अधिका-यांना जबाबदाद धरता येईल चांगले काम केल्यास महापालिकेच्या अधिका-यांना क्रेडिट मिळू द्यावे.

मा.आयुक्त : जे.ई.चा पुर्ण वापर करून घेतला जाईल त्यानंतर कॉम्प्युटरायझेशनमुळे जास्तीचे काम झाले तर खाजगी एजन्सीला देवून त्यानंतर ही जास्तीचे काम असेल तर तेवढयाच कामासाठी पीएमसी नेमून कार्यवाही केली जाईल.

(यानंतर मा. आयुक्त उर्वरीत विकास कामाच्या संदर्भात बजेट बुक मधील क्रमांकवाईज प्रेजेन्टेशन करतात.)

श्री.अ.रशिद खान : वाघाचा मृत्यू कशामूळे झाला. चांगले मांस दिले जात नाही असे माझे मत आहे.दोन तासात प्रेत जाळले.

मा.आयुक्त : या संबधीत मा.सभापती यांनी प्रत्यक्ष येवून चौकशी करावी जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही केली जाईल.

श्री.अ.रशिद खान : मांस देण्याऐवजी हाडे खाण्यासाठी देत आहे त्यामूळे मृत्यू झाला. मी स्वतः दाखवून दिले काय कार्यवाही केली.

मा.आयुक्त : दोन तासात नाही, शवविच्छेदन केल्यानंतर कार्यवाही केली आहे. त्याची व्हिडीओ रेकॉर्डींग झालेली आहे.

मा.सभापती : मांस खरेदीच्या वेळी टेंडरमध्ये जे रेट येतात ते मार्केटपेक्षा ५० टक्के कमी दराचे असतात कमी दर देवून चांगले बिफ खन्नी देणार का याचा ही विचार केला पाहिजे.

मा.आयुक्त : चांगल्या क्वॉलीटीचे मांस दिले जाते की नाही याची तपासणी केली जाईल.

श्री.अ.रशिद खान : त्या ठिकाणी टेक्नीकल अधिकारी असायला पाहिजे.

मा.सभापती : हा विषय जनरल बैठकीत घेतला जाईल आज बजेटची सभा आहे.

(यानंतर मा. आयुक्त बजेटबुकमधील उर्वरीत विकास कामाच्या संदर्भात क्रमांकवाईज प्रेजेन्टेशन करतात. )

मा.सभापती : आता बजेट मधील उत्पन्न बाजूवर चर्चा करावी.

श्री.सेंजय जोशी : यात मालमत्ता कराचे उद्दिष्ट किती आहे गेल्या वर्षी किती होते त्यातील वसुली किती टक्के झालेली आहे.

मा.आयुक्त : मागिल वर्षी १७ कोटी वसूल झालेले होते.

श्री.संजय जोशी : प्रशासनाचे अपेक्षीत उत्पन्न मागिल वर्षाचे किती होते.

उपआयुक्त(सिडको) : सन २००६-०७ मध्ये १७ कोटी वसूल झाले.

श्री.संजय जोशी : माझे माहिती प्रमाणे २८ कोटी होती या वर्षी २५ कोटी ठेवले आहे. दोन तीन वर्षापासून स्पेक एजन्सी काम करीत आहे. १.१८कोटी स्पेकला दिले त्यामुळे किती फायदा महापालिकेला झालेला आहे.

उपआयुक्त(सिडको) :पुर्वी ९८ हजार मालमत्ता होत्या स्पेकने सर्वे केल्यानंतर १ लक्ष ३७ म्हणजे ३९ हजार मालमत्तेत वाढ झाली.

श्री.संजय जोशी : रिसेटलमेन्ट किती मालमत्ताचे करावे लागले. वार्ड कार्यालय फ मधील मी ३०-४० मालमत्ततेच्या संदर्भात वार्ड अधिकारी व अभियंता यांना सदर ठिकाणी घेवून गेले तिस-या मजल्यावर हवेत रूम वाढविल्या असे म्हटले होते. सर्व रद्द करावे लागले अशा किती मालमत्ता आहे.

मा.आयुक्त :तशा मालमत्ता असतील परंतू लगेच सांगता येणार नाही.

श्री.संजय सिरसाट :जर ९८ हजार मालमत्तेपाटी १७ कोटी वसूल होत असेल तर ज्या ३९ हजार जास्तीच्या मालमत्ता वाढल्या त्यापोटी किती रक्कम मिळावयास पाहिजे ती मिळाली का?

उपआयुक्त(सिडको) : १५.५० कोटी ही पुर्वीची डिमांड होती. नवीन मालमत्ता ॲड झाल्यामुळे ३५ कोटीची डिमांड आहे.

श्री.संजय जोशी : स्पेकच्या सर्वेमुळेकिती मालमत्ता करात किती वाढ झाली.

मा.आयुक्त : स्पेकने ३५ कोटीचे डिमांड करून दिले त्यात किती वसूली झाले वसूली करणे हे महापालिकेवर अवलंबून आहे.

श्री.संजय जोशी : वसूली होणे बाजूलाच आहे परंतू त्या मालमत्तेविषयी कोणताही डाटा महापालिकेकडे नाही.

मा.आयुक्त : स्पेकने केलेल्या सर्वेनुसार १.३७ लक्ष मालमत्ता असून डिमांड ३५ कोटी आहे. मागिल वर्षी संगणकाद्वारे बील केले त्या विषयी हेरींग झाली १३ हजार लोकांनी ऑब्जेक्शन घेतले त्यात जुने मालमत्ताचे सुध्दा होते.

श्री.संजय जोशी : स्पेकला १.३० कोटी सर्वेसाठी दिले खर्चाच्या तुलनेत स्पेकने किती कोटीचे उत्पन्न करून दिले.

मा.आयुक्त : वसूल करणार असेल तर प्रत्येक वर्षाचे १८ कोटी येतील.

श्री.संजय जोशी : वसूल होणार आहे का मागिल बजेटच्या वेळी वसूली बाबत जबाबदारी फिक्स करावी म्हणून म्हटले होते. वसूली झालेली नाही. १.३० कोटी स्पेकला दिले त्यामुळे दर वर्षी १८ कोटी वाढ होईल हे कागदावर असेल परंतु हे सत्य आहे का?

मा.आयुक्त : डिमांड वाढली हे सत्य आहे ते वसुल करण्याची महापालिकेची जबाबदारी आहे.

श्री.संजय जोशी : डीमांड मध्ये सत्यता नाही रियालिटी नाही. असेल तर तसे खुलासा द्यावा.

मा.आयुक्त : अमुक मध्ये बदल झाला वाढीव झाले म्हणून हेरींगसाठी नोटीस देतो.

श्री.संजय सिरसाट :हेरींगसाठी नोटीस दिल्या होत्या तर स्पेकचे पेमेन्ट थांबविण्याचे कारण काय?

मा.आयुक्त : काम पूर्ण तसेच लिकिंग झालेली नव्हती. ३५ कोटीची डिमांड आहे. सर्व लोकांना नोटीस दिल्या ज्यांनी तक्रार केली त्यावर हेरींग घेतली परंतु काही प्रकरणात लिंकींग झाले नाही. १,४४,०००/- मिळकत धारकांना नोटीस दिल्या होत्या.

श्री.संजय सिरसाट : ३ वर्षात नवीन १५-२० घरास बांधकाम परवानगी दिली असेल. ज्या रेकॉर्डवर आल्या नव्हत्या त्या पण आलेल्या आहेत का?

मा.आयुक्त : जुन्या ज्या मालमत्ता आहे त्यात वाढ किंवा बदल झाला असेल त्या सुध्दा घेतलेल्या आहेत. ३ वर्षात किती परवानगी दिलेल्या असतील हे आताच सांगता येणार नाही.

श्री.संजय सिरसाट : नगररचना विभागाकडून दुरूस्तीसाठी जी परवानगी दिली जाते अशा मालमत्तांना वाढीव टॅक्स लावण्याचे लिंक यात झालेले नाही.

श्री.संजय जोशी : महिण्याला १.२५ कोटी असे वर्षाला १२-१४ कोटीचे उत्पन्न परवानगीचे मिळतात. त्यानुसार त्या मालमत्तांना टॅक्स लागणे ही आवश्यक आहे.

मा.आयुक्त : नवीन परवानगी किती दिली जाते हे आता लगेच सांगता येणार नाही. १० लक्ष लोकसंख्येच्या तुलनेत जवळपास २ लक्ष घरे असायला पाहिजे. सिडको व इतर मालमत्ता गृहीत धरता १.६८ लक्ष आहे आणखी ३० ते ३२ हजार घरे आढळून येत नाही.

श्री.संजय जोशी : मुळ प्रश्नावर येवू स्पेकला १.३० कोटी दिले त्यामुळे महापालिकेला किती रक्कम मिळाली. डिमांड नाही.

मा.आयुक्त : जे स्पेकने बील तयार करून दिले त्यातील जुने मालमत्तेचे १०० टक्के लिंक झाली नसल्यामूळे जे बील दिले ते जुने प्रमाणे बिल दिले नवीन बील दिलेले नाही.या वर्षी स्पेकच्या बिलाप्रमाणे १०० टक्के बिले वाटप करून कार्यवाही करायची आहे.

श्री.संजय जोशी : संबधीत नागरीकांना आकारलेला कर मान्यच नाही तर बिल वाटप करून उपयोग नाही प्रॅक्टीकली जागेवर नेवून दाखवले तिस-या मजल्यावर प्लॅट आहे त्यात दोन रूम वाढवल्या नसतांना दाखवले गेल्यास लिंकींग कसे करणार.

मा.आयुक्त : यासाठीच हेरींग घेतलेली होती. १.४० लक्ष लोकांना नोटीसेस दिल्या १२ हजार लोकांनी तक्रार दिली.

श्री.संजय जोशी : अनेक नागरीक झोन कार्यालयात येतात स्पेकचे कर्मचारी नाही म्हणून लिंक करू शकत नाही असे सांगितले जाते.

मा.आयुक्त : येत असलेल्या अडचणी दुर करणे व जे ३५ कोटीचे वाढीव डिमांड दिलेले आहे त्याचे बिल काढणे हा मुख्य उद्देश आहे.

श्री.संजय जोशी : स्पेकचा १०० टक्के उद्देश साध्य झाला असेल तर किती रक्कम महापालिकेच्या तिजोरीत आली.

मा.आयुक्त : जुन्या मालमत्तेचे बिल घेवून रेकॉर्ड तपासले असते तर लिंकिंगची गरज भासली नसती. ते बाजूला ठेवून १०० टक्के सर्वे करून घेतला त्यामूळे नवीन व जुन्या घरांचा नंबर लिकिंग करणे कठीण होत आहे.

श्री.संजय जोशी : यात प्रशासनाची चुक झाली ज्या वेळेस स्पेकने टॅक्स आकारणी केली त्यावेळेस लिंक केले असते तर ही अडचण आली नसती.

मा.आयुक्त : स्पेकला दिलेल्या रक्कमेच्या मोबदल्यात ३७ हजार नवीन घरे शोधलेली आहे. नवीन मालमत्ता रेकॉर्डवर करून घेतल्या नकाशा करून घेतला ५-१० टक्के चूक असतील नसतील.

श्री.संजय जोशी : एवढे कमी घरे सर्वेमध्ये येत असतील तर अतिक्रमण विभाग बंद करावा.

मा.आयुक्त : स्पेकने दिलेले रेकॉर्ड व जूने रेकॉर्ड लिकिंग करून नागरीकांना नवीन दराने टॅक्स डिमांड दयावी लागेल

मा.सभापती : स्पेकने केलेला सर्वेनुसार टॅक्स आला तो लोकांना मान्य नाही.

मा.आयुक्त : नवीन जो सर्वे केला त्यास नंबर लावण्याचे काम चालू आहे. स्पेकला आता बंद केले आहे. नवीन घराचे जे रेकॉर्ड केले व जुने रजिस्टर नुसार ९० हजार पैकी ४० हजार घराचे लिकिंग झालेली असून उर्वरीत घराचे लिकिंक करावे लागेल. ते करतांना महापालिकेकडे जे रेकॉर्ड आहे त्यात सुध्दा दुरूस्ती करावी लागेल.एकच मालमत्ता रजिस्टरवर तीन - तीन ठिकाणी आलेली आहे. पुढील दोन तीन महिण्यात रजिस्टरचे एक एक पान क्लोज करावे लागणार असून स्पेकने जे नवीन रजिस्टर केले त्यात ॲड करावे लागेल. त्यानंतर स्पेकच्या सर्वेनुसार नोटीसेस देवून जे लोक ऑब्जेक्शन घेतील त्यांचे घराचे जागेवर जावून सुनावणी घेवून अंतिम करावे लागेल. एकच मालमत्तेला दोन बिल देवू शकत नाही. एकतर पुर्वीचे सर्व रेकॉर्ड घेवून रजिस्टर बंद करावे

लागेल. सर्वाना नव्याने नोटीसेस दयाव्या लागतील किंवा लिंक करून जुने थकबाकी त्यावर नोंद करून नवीन बिल द्यावे लागेल.

श्री.संजय सिरसाट : नोटीस देवून हेरींगसाठी बोलविले असता टॅक्सही भरणा करीत नाही हेरींगसाठीही येत नाही.

मा.आयुक्त : ज्या लोकांची हेरींग झाली त्यांचे १०० टक्के डिसाईड पण झाले. नोटीसेस दिल्यानंतर १३ हजार लोकांनी ऑब्जक्शन घेतले त्यांचे हेरींगचे काम संपलेले आहे. अडचण अशी की स्पेकने जे व्हॅल्यूएशन काढलेले आहे त्या प्रमाणे बिल आतापर्यंत देवू शकलो नाही. त्यामूळे वसूली झाली नाही. सिडको भाग वगळता कुठे ही स्पेकची बिले महापालिकेने दिलेली नाही.

श्री.संजय जोशी : मालमत्ता कराची रक्कम जास्त वसुल होण्यासाठी काय उपाययोजना केलेली आहे.

मा.आयुक्त : एप्रिल मध्ये जुने रजिस्टरवर जी थकबाकी आहे ती मालमत्ता स्पेकच्या सर्वेनुसार कोणत्या क्रमांकावर आलेली आहे तेथे ती रक्कम नोंद करावी लागेल मे जून मध्ये नवीन बील द्यावे लागेल. यात काही लोक आब्जेक्शन घेवू शकतात. त्यांची हेरींग घेवून मे-जून मध्ये बील देवून वसुली करावी लागेल.

श्री.संजय जोशी : मालमत्ता लिकिंग करण्याचे काम स्पेकचे होते आता महापालिकेने का करावे.करारनामा केले त्यात काय होते. काही न करता १.३० कोटी रक्कम कशाच्या अधारे दिली.

मा.आयुक्त : प्रशासन व सभागृहाने निर्णय घेतल्यानुसार १५३ रू प्रत्येक मालमत्ते मागे देण्याचे ठरविले १०० टक्के स्पेकनेच काम करायचे होते. ३१ हजार सिडकोसह एकूण १.६८ लक्ष मालमत्तेचा त्यांनी सर्वे केलेला आहे.

श्री.संजय जोशी : शहराच्या मालमत्तेचा सर्वेचे काम दिले होते. सिडकोचे कोणतेही उत्पन्न नाही तो विषय काढू नये.

उपआयुक्त(सिडको) : सिडकोतून मालमत्ता करा पोटी ०३ कोटी वसूल झालेले आहे.

श्रीमती जयश्री किवळेकर : शहराचा सर्वे करून नवीन मालमत्ता शोधण्यासाठी स्पेकला काम दिले महापालिकेने उत्पन्न वाढेल व त्यातून विकास कामे करता येतील हा उद्येश त्या मागे होता परंतू जेंव्हा शहरात सर्वेचे काम होते होते स्पेकचा रेकॉर्ड बघून आम्ही सदस्यांनी अशी मागणी केली होती की सिडकोची घरे ही ऑलरेडी कशा पध्दतीची व किती प्रमाणात बांधकाम केलेले आहे रेकॉर्ड आहेत. असे असतांना स्पेक एजन्सी कशासाठी नियुक्त केली.टेंक्नीकल कर्मचारी नव्हते वाटेल तो कर ज्यांना १३ हजार येणार त्यांना ३० हजारची आकारणी करायची त्यामुळे स्पेकच्या सर्वेमूळे वसुलीवर परीणाम झाला, कर भरणा करणे बंद केले होते, स्पेकला बंद केले आता आपले कर्मचा-यांनी नोटीसेस दिल्या मुळे आता लोक टॅक्स भरणा करीत आहे. प्रामाणिकपणे टॅक्स भरणा करणारे नागरीक सिडकोचे आहे.

मा.आयुक्त : सिडकोच्या कर भरणा करणारे आहे मान्य आहे म्हणूनच त्यांनी न्३ कोटी कर भरणा केलेला आहे.सिडकोचा सर्वे स्पेककडून १०० टक्के करून घेतलेला आहे. बजेटची सभा आहे वसुली उद्दीष्ट सभागृहाने द्यावे.

श्री.संजय जोशी : नुसते टारगेट देवून उपयोग नाही ५१ कोटीचे दिले तेवढी वसूली झाली नाही. पुढील वर्षी अमुक कारणामूळे वसूल झाले नाही असे कारण दाखवू नये.

मा.आयुक्त : जे ३२ कोटी मालमत्ता कराचे टारगेट ठेवले त्यात वाढ करू नये. एकूण डिमांड ४५ कोटीपर्यत असेल त्यातून या वर्षी ३२ कोटी मिळावयास पाहिजे. नवीन सर्वे करणार तेंव्हा मालमत्ता करात वाढ होईल रेट ऑफ टॅक्सेस वाढविले नाही.

श्रीमती जयश्री किवळेकर : तीन वर्षापासून प्रशासन जे उद्दिष्ट ठेवले ते पूर्ण होत नाही. यास जबाबदार कोण. सिडकोचा दोन वर्षाचा टॅक्स पूर्ण पणे वसूल झाला असता परंतू सन २००८ च्या डिमांड नोटीसेस उशीरा मिळाल्याने वसुली कमी झालेली आहे.

श्री.संजय जोशी : दर ३-३ महिण्यानी मालमत्ता कराच्या वसूलीचे टारगेट सुरू करावे. जास्तीत जास्त कर वसूल होईल. सरासरी काढले तर नोंव्हेबर पासून १.२५ - १.२५ कोटी टॅक्स वसूल होण्यास सुरूवात होते.

मा.सभापती : सभा १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात येते.

(वेळ दु. ३-३० वा. दु.४.१५पुन्हा सभेला सुरूवात)

श्री.अ.रशिद खान : तीन वर्षाचे टारगेट काढून बजेट फिक्स करावे लागते असा नियम आहे. २४३ कोटी टारगेट यायला पाहिजे ३१५ कोटीचे होत आहे. पान आर -२ वर मालमत्ता किती थकबाकी किती नमुद केले नाही. पुन्हा ३२ कोटीवर आणून ठेवले. सिडकोकडून टॅक्स वसूल करीत आहे. एन -६, ७, ८ मधील घरे सिडकोने दिली ती लिजवर आहे त्यावर कोणत्या पध्दतीने टॅक्स आकारणी केली जात आहे. नावावर का होत नाही. हस्तांतर करण्याची सिस्टीम काय आहे, सिडकोच्या नावावर घर आहे. त्यावर कर लावू शकतो का. संबधीत व्यक्तीच्या नावावर घर असावेत. ड वर्गवारी मध्ये ठेवून आकारणी करू शकत नाही. चूकीचे दाखवले जात आहे.५१ कोटीचे टारगेट १७ कोटी वसूल होत आहे चूक कुणाची आहे.१.३५ लक्ष मालमत्ता आहे यात वाढ करून आणखी ५-७ कोटी टारगेट देवून वसूली होवू शकते. जमिन विकास शुल्क १९९२ पासून वाढ केलेली नाही. २०रू ऐवजी ३० रू. क्वेअर मीटर करावे. ३ कोटी ऐवजी ४ कोटी करावे, पान क्र. आर -२ वर अ.क्र.८ वर मोबाईल टावर्स १६० असल्याचा सर्वसाधारण सभेत खुलासा केला होता रेकॉर्डला ६० आहे १.५० कोटी टारगेट दिले. उर्वरीत १०० टावर्सला रेग्यूलर करून परवाना शुल्क व इतर शुल्क पासून मोठी रक्कम मिळू शकते १.०० कोटीची वाढ करावी. दुकान भाडे वाढले पाहिजे नुकतीच जाहिरात दिली आहे. पान क्र. आर-३ वर अ-क्र.१ वर दुकान भाडे नुकतीच जाहिरात दिली आहे दुकान भाडे येणार आहे. यातही वाढ केली पाहिजे.आर-१० वर क्र. १ वर प्राथमिक शिक्षण अनुदान किती येते व किती येणे बाकी आहे. शाळेच्या इमारतीचे भाडे मिळते किती शाळा आहे. याचा यात उल्लेख नाही. तो असावा.आर-२१ क्र.४ वर अवैध नळ नियमीत करणे शुल्क वसुली ६५ हजार नवीन घरे आहे असे आताच म्हटले त्यात किमान २५ हजार अनाधिकृत नळ असू शकतील यांना रेग्यूलाईज केल्यास ८-९ कोटी येवू शकतील.,एक नळामागे ३०००रू प्रमाणे किमानद १० हजार नळाचे जवळपास ३ कोटी रूपये होतात.यात वाढ करावी.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : अनधिकृत नळ कनेक्शन जागेवर ५०० रू घेवून अधिकृत करावे. ३ ते ४ हजार कुणीही भरणा करणार नाही नागरीकांना सवलत देण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान : हा निर्णय घेण्यासाठी सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागेल पॉलीसी मॅटर आहे. यात ७ कोटीची वाढ करावी. पान क्र.ई-३२ अ.क्र. २ वर खाजगी तत्वावर कचरा उचलणे १० वर्षासाठी किती मध्ये टेंडर गेलेले आहे. १०८ कोटीमध्ये टेंडर दिले. या पध्दतीने कार्यवाही केल्यास कचरा उचलणारे कर्मचारी इतर कामासाठी घेता येईल. १०.८० कोटी होत आहे त्यातील १.२० कोटी शिल्लक राहतात ई -३३ वर वैद्यकीय कच-याची विल्लेवाट लावण्यासाठी खर्च किती खर्च येत आहे.कमी होत आहे यात पाच लक्षची वाढ करावी.डब्ल्यु-५५ वर क्र.१ वर क वार्ड कार्यालय मध्ये बाग देखभाल दुरूस्तीसाठी काहीही तरतूद नाही. या कार्यालय अतंर्गत सिध्देश्वर कॉलनी, औरंगाबाद टाईम्स कॉलनी, त्रिमुर्ती सोसायटी, मुजीब कॉलनी, एसटी कॉलनी उद्यान विकसीत करणेसाठी तरतूद ठेवली नाही.

मुख्यलेखाधिकारी : मागिल वर्षापासून वार्ड कार्यालयाची जी वसुली राहिल त्याप्रमाणे साधारणत:२९ लेखाशिर्षक दिलेले आहे त्याप्रमाणे वार्ड कार्यालयाचे कामे प्रस्तावित केले. बजेट वार्ड कार्यालय मंजूर करते व ते नंतर इकडे सादर करण्यात येते. वार्ड क च्या सभागृहाने मंजूर करून सादर केलेले आहे. त्यांनी नमूद करावयास पाहिजे.

श्री.अ.रशिद खान : त्या सभागृहाने नसेल दिले परंतू त्या भागात अनेक कॉलनी आहेत दोन-पाच लक्ष ठेवावे.पान क्र.५६ क्र. ५ वर मनपा शाळा देखभाल दुरूस्ती साठी आणखी वाढीव तरतुद करावी.

मा.सभापती : तरतूद केली जाईल.

श्री.अ.रशिद खान : मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी देखभाल दुरूस्तीसाठी तरतूद ठेवावी.

मा.सभापती : तीनही रिसर्च सेंन्टरसाठी प्रत्येकी २.५० लक्ष देखभाल दुरूस्तीसाठी तरतूद करण्यात येते.

श्रीमती जयश्री किवळेकर : डब्ल्यू -४६ ते ५५ पर्यत वार्ड क्र. ७२ साठी पाण्याच्या वर खर्च करण्यासाठी तरतूद ठेवली नाही. तसेच नवीन लाईन बदलण्यासाठी कूठेही तरतूद दिसून येत नाही. माझ्या प्रभागात प्रतिष्ठीत लोक राहतात. १९८४ मध्ये सिडकोने जी पाण्याची लाईन टाकलेली आहे ती लहान साईजची आहे ती बदलण्यात यावी. १०लक्ष पाण्याची लाईन बदलण्यासाठी ठेवण्यात यावे.आम्हा सदस्यांना पत्र आले होते वार्ड वसुलीच्या नुसार १२-१२ लक्षची कामे दिलेली आहे. त्यात पाणीपुरवठा हा विषय नाही.कोणत्या प्रभागात काम करण्याची गरज पडणार आहे याचा विचार करून तरतूद का ठेवलेली नाही.

मा.सभापती : बजेटमध्ये तरतूद करावी लागेल.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : माझे वार्डात गुंठेवारी भाग असून गुंठेवारी भागात विविध कामे घेतलेली आहे २५ लक्ष जमा झालेली रक्कम आहे वार्डात एकही काम का घेतलेले नाही.

मा.सभापती : २५ लक्ष जमा आहे त्यातून कामे करण्यात येतील.जी महत्वाची कामे आहे ती घेतली जाईल.

श्री.मो.जोवद मो.इसाक : वार्ड कार्यालय क साठी ४ कोटीच तरतूद का करण्यात आली. उर्वरीत इतर वार्डकार्यालयासाठी जास्तीची तरतूद आहे.

मा.सभापती : वसुलीच्या प्रमाणानुसार ठेवले असावेत.

श्री.मो.जावेद मो.इसहाक : महापालिका ही व्यवसाय करीत नाही. ज्या भागात वसुली तेथेच कामे होतील. या वार्ड कार्यालय अंतर्गत गरीब लोकांची जास्त वस्ती असून स्लम भाग आहे. या भागात निवासी वापर जास्त असल्याने वसुली कमी होणारच आहे. आणखी एक कोटीची वाढ करण्यात यावी.

मा.सभापती : मागिल बैठकीत सर्व पदाधिकारी अधिकारी मिळून निर्णय झाला होता की जेथे वसुली जास्त तेथे तरतुद ही जास्त असावी. आपण केलेल्या सुचनेनुसार पुन्हा पॉलीसी डिसीजन बदलावे लागेल. माझाही वार्ड त्या वार्ड कार्यालय अंतर्गत येतो. योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : माझे वार्डात तुळशी अपार्टमेंन्टमधील लोकांना गेल्या २० वर्षापासून पुरेसे पाणी मिळत नाही. तुळशी अपार्टमेंन्ट ते गाडे चौक पर्यत पाण्याची लाईन टाकणे आहे त्यासाठी २५ लक्षची तरतूद करावी.

श्री.संजय जोशी : बजेटवर बरीच चर्चा झालेली आहे. ज्या गोष्टी प्रशासनाने मान्य करावयास पाहिजे त्या नेहमी प्रमाणे मान्य करीत नाही.सर्व बाबीचा विचार करता ज्येष्ठ सदस्य श्री.अ.रशीद खान मामू यांनी बजेटमध्ये बऱ्याच दुरूस्त्या सुचवल्या वसुली कशी वाढेल हा मुद्या त्यांनी मांडला हे सभागृह सभापतीना सर्व अधिकार देत आहे किती वाढ करू शकतो हे सभापती म्हणून आपण जाहीर

करावे. त्याप्रमाणे या अर्थसंकल्पास मान्यता दयावी अशी सभागृहाच्या वतीने मागणी करतो.

मा.सभापती : सर्व स.सदस्यांची भावना व विकास कामाबद्दलची तळमळ विचारात घेता सिडको भागातील मालमत्ता कराची आकारणी पुर्ण झाल्यामूळे प्रभागातून मालमत्ता कराची वसुली करण्यात येत असल्यामूळे मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ होणार आहे ही बाब विचारात घेता मालमत्ता कराचे उद्दिष्ठ ३२ कोटी ऐवजी ३९ कोटी करण्यात येते. ज्येष्ठ सदस्य श्री.अ.रशिद खान मामू तसेच श्री.संजय जोशी व इतर सदस्यांनी पाणीपटटी वसुलीमध्ये वाढ सूचवली पाणीपटटीची चालू मागणी व थकबाकीचा एकत्रित विचार करीत प्रशासनाने ठेवलेले उदिदष्ट २८ कोटी ऐवजी ३५ कोटी करण्यात येते. नगररचना विभागाकडून प्राप्त होणारे अपेक्षीत उत्पन्नात एक कोटीची वाढ करण्यात येते. वरील प्रमाणे प्रशासनाने सादर केलेले अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये रूपये १५ कोटीची वाढ करण्यात येवून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ नुसार प्रशासनाने सादर केलेले सन २००७-०८ च्या सुधारीत अंदाजपत्रकास व सन २००८-०९ चे मुळ अंदाजपत्रक रूपये ३५२ कोटी २१ लाख ९७ हजार जमा व रू.३५२ कोटी ७५ हजार खर्चाचे व रू. २१ लक्ष २२ हजार शिल्लकीच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २००७-०८ चे सुधारित अंदाज व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २००८-०९ चे मुळ अंदाज मा.स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यात आले. सदर बैठकीत सर्वंकष चर्चा होऊन सन २००७-०८ चे सुधारित अंदाज जमा रक्कम रू.२५७ कोटी ६४ लाख २५ हजार, यामध्ये प्रारंभीची शिल्लक २१ कोटी ५० लक्ष ३७ हजार असे एकुण २७९ कोटी १४ लक्ष ६२ हजार रक्कमेचा विचार करून खर्च रक्कम रू.२५७ कोटी ७७ लाख २५ हजार इतका लक्षा घेता रू.२१ कोटी ३७ लाख ३७ हजार शिलकीच्या सुधारित अंदाजास मंजुरी देण्यात येते.

सन २००८-०९ च्या मुळ अंदाजावर सर्व सदस्यांनी अभ्यासपुर्वक चर्चा करून व केलेल्या सुचनांची दखल घेऊन मुळ अंदाजपत्रक रू.३३० कोटी ८४ लाख ६० हजार जमा यामध्ये प्रारंभीची शिल्लक रू.२१ कोटी ३७ लाख ३७ हजार असे एकुण रू.३५२ कोटी २१ लाख ९७ हजार जमेचा विचार करून खर्च रू.३५२ कोटी ७५ हजार अपेक्षित धरता रू.२१ लाख २२ हजाराच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावासह सर्वानुमते मान्यता देण्यात येते. प्रशासनातर्फे सादर करण्यात आलेले सन २००७-०८ च्या सुधारित व सन २००८-०९ चे मुळ अर्थसंकल्पात सभापती, स्थायी समिती व स.सदस्यांच्या सल्ल्यानुसार फेरफार व दुरूस्ती करण्यात येऊन प्रस्ताव फेरफार/दुरूस्तीसह मान्य करून मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीकरीता सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीता नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद